आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१९ जून २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पदपथावरुन चालणं हा नागरिकांचा मूलभूत अधिकार, वाहनांपेक्षा पादचाऱ्यांच्या अधिकारांना प्राधान्य देण गरजेचं असल्याचं सर्वोच्च न्यायालयाच मत

- प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही देशातल्या तरुणांच्या क्षमतांचं संधीत रुपांतर करेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गातल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याची गरज नाही

आणि

- राज्य सरकारचे २०२३ चे विविध कृषी पुरस्कार जाहीर

<><><><><>

चिन्हांकित पदपथावरून चालण्याचा अधिकार हा एक मूलभूत अधिकार असल्याचा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने आज दिला. मोटार वाहनांच्या वाहतुकीपेक्षा चिन्हांकित पदपथावरून चालण्याच्या नागरिकांच्या अधिकाराला अधिक प्राधान्य दिलं जावं, असं न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि ए. एस. चांदुरकर यांच्या पीठाने स्पष्ट केलं. एका रस्ते अपघातासंबंधी नुकसानभरपाईच्या खटल्यावर सुनावणी करताना न्यायालयानं सांगितलं की, हा अधिकार राज्यघटनेच्या कलम १९ (1)ड अन्वये मिळणाऱ्या मुक्त संचाराच्या अधिकाराचा आणि कलम २१ अन्वये जीवन आणि स्वातंत्र्यासह इतर मूलभूत अधिकारांचाच भाग आहे. त्यामुळे रस्त्यालगत पादचाऱ्यांसाठी चिन्हांकित आणि सुस्थितीत असलेले पदपथ उपलब्ध करून देणं हे संबंधित यंत्रणांचं कर्तव्य आहे, असंही न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

बँका, कर्ज पुर्ननिर्धारण कंपन्या आणि कर्जदार यांच्यात मोठं संगनमत आहे. त्यामुळं कर्ज वसुलीसाठी फारसे प्रयत्न होत नाही आणि करदात्यांच्या पैशांचा गैरवापर होत असल्याचं निरीक्षण सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलं आहे. सार्वजनिक क्षेत्रातल्या एका बँकेनं १ हजार ५३७ कोटींचं कर्ज दिलं होतं. ते थकित राहिल्यानंतर कर्ज पुर्ननिर्धारण कंपन्यांच्या माध्यमातून

केवळ साडे ७३ कोटी रुपये बँकेला मिळाले. याप्रकरणातल्या याचिकेवरच्या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयानं हे मत नोंदवलं. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेला नोटीस बजावली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना ही देशातल्या तरुणांच्या क्षमतांचं संधीत रुपांतर करेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी बोलत होते. ही भारतातील तरुणांना सक्षम करण्याच्या आणि रोजगारावर आधारित विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या योजनेच्या आतापर्यंतच्या यशाबद्दल प्रधानमंत्री म्हणाले..

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देणं आणि संबंधित कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या औद्योगिक संस्थांनाही प्रोत्साहनपर अनुदान देणं, अशा दोन भागात ही योजना राबवली जाणार आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या यशात स्वदेशी उपकरणांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याचप्रमाणे ही ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस देशाला संरक्षण प्रणालीसह इतर धोरणात्मक उद्योगांसाठी भारताला स्वावलंबी बनवेल, असा ठाम विश्वास संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केली. नागपूरजवळ अंबाझरी इथल्या शस्त्र कारखान्यात आज दहा हजार टनाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस या यंत्राची पायाभरणी सिंह यांच्या हस्ते करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. ही यंत्रणा आधुनिक लढाऊ विमानं, क्षेपणास्त्र आणि प्रगत अंतराळ संशोधन उपक्रमांसाठी वजनाला हलक्या आणि मजबूत धातूची निर्मिती करेल. त्यामुळे महत्त्वाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रूशन्सच्या आयातीवरचं अवलंबित्व कमी होऊन देशांतर्गत पुरवठा साखळी बळकट व्हायला मदत मिळेल. तसंच, स्वदेशी उत्पादनांच्या माध्यमातून धोरणात्मक क्षेत्रांमधल्या भविष्यातल्या गरजा पूर्ण करण्यासाठी सहाय्यक ठरेल, असं प्रतिपादनही सिंह यांनी यावेळी केलं. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस उपस्थित होते.

<><><><><>

सीमाशुल्क निर्यात आयात सुविधा केंद्राच्या सिंगल विंडो सुविधेचं उद्घाटन आज मुंबईत सीप्झ इथं वाणिज्य आणि उद्योग तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जितिन प्रसाद हस्ते झालं. नवीन कस्टम्स सुविधा केंद्रामुळे प्रक्रिया सुलभ होतील, व्यवहाराचा वेळ कमी होईल आणि एकाच छताखाली अखंडपणे सेवा मिळतील; यामुळे 'व्यवसाय सुलभता' वाढेल आणि निर्यातदारांना विकास व स्पर्धाक्षमतेवर लक्ष केंद्रित करणे शक्य होईल, असं त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

अनुसूचित जाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करताना अधिवास प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. यामुळे विद्यार्थ्यांवरचा कागदपत्रांची पूर्तता करण्याचा ताण कमी होईल, अर्ज प्रक्रिया अधिक सोपी होईल आणि शिष्यवृत्तीचा लाभ घेणं अधिक सोपं होईल, असं केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

नीट यूजी फेरपरीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं एक अधिकृत व्हॉटसअप संपर्क वाहिनी सुरु केली आहे. परीक्षे संदर्भातली सर्व अधिकृत माहिती ७८२७९८०२८७ या व्हॉटसअप क्रमांकावर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. आपल्या व्हॉट्सअप वर परीक्षेसंबंधी कोणताही संदेश आल्यास ब्लू व्हेरिफिकेशन टिक आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीचे नाव असल्याची खात्री करुन घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे. नीट यूजीची फेरपरीक्षा येत्या रविवारी होणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी २१ जूनच्या परीक्षेसाठी आपलं हॉल तिकीट या आधी डाऊनलोड केलं आहे. त्यांना पुन्हा ते डाऊनलोड करण्याची गरज नसल्याचंही चाचणी संस्थेनं म्हटलं आहे. ३ मे रोजीच्या परीक्षेसाठीचं डाऊनलोड केललं हॉल तिकीट या परीक्षेला चालणार नसल्याचंही स्पष्ट करण्यात आलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र शासनानं आज २०२३ च्या विविध कृषी पुरस्कारांच्या मानकऱ्यांची नावं जाहीर केली. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातले डॉ. संजय ज्ञानदेव पाटील यांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार मिळाला आहे. वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार सिंधुदुर्ग जिल्ह्यातले शरद धुरी, नाशिक जिल्ह्यातले बाळासाहेब देवरे, सोलापूर जिल्ह्यातले शिवानंद

शिंगडगाव, सातारा जिल्ह्यातले गणपत पारटे, जालना जिल्ह्यातले अभयकुमार काळुंके आणि वाशिम जिल्ह्यातले हेमंत देशमुख यांना जाहीर झाला आहे. तर जिजामाता कृषीभूषण पुरस्कार ठाणे जिल्ह्यातल्या दर्शना दामले, नाशिक जिल्ह्यातल्या भावना निकम, अहिल्यानगर जिल्ह्यातल्या श्रद्धा ढवन आणि कोल्हापूर जिल्ह्यातल्या अरुंधती पाटील यांना मिळाला आहे.

<><><><><>

बेस्ट कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, सर्व मुद्द्यांवर समन्वयातून मार्ग काढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं. बेस्ट कृती समितीच्या प्रतिनिधींसोबत मुंबईत झालेल्या बैठकीत ते बोलत होते. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आगामी पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अंतिम तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. महाव्यवस्थापक स्तरावर पूर्ण करता येण्याजोग्या मागण्या या आठवड्यात पूर्ण करण्याचे निर्देश संबंधितांना दिल्याचं त्यांनी सांगितलं. मुंबईकरांचे हाल टाळण्यासाठी बेस्ट कर्मचाऱ्यांनी आपला संप मागे घ्यावा असं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत आज रात्री वॉशिंग्टनमधे सिएटल स्टेडियमवर ड गटात अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री साडे बारा वाजता हा सामना सुरू होईल. दोन्ही संघांनी आपापले सुरुवातीचे सामने जिंकले आहेत. अमेरिकेनं पॅराग्वेवर ४-१ नं, तर ऑस्ट्रेलियानं तुर्कीवर २-० असा विजय मिळवला. 'राउंड ऑफ ३२' मधे आपलं स्थान निश्चित करण्यासाठी आज दोन्ही संघ आणखी एक विजय मिळवण्याचा प्रयत्न करतील.

आज सकाळी ग्वाडलजारा स्टेडियमवर झालेल्या अ गटातल्या सामन्यात दक्षिण कोरियाचा १-० असा पराभव करून मेक्सिको यावेळी 'राउंड ऑफ ३२' साठी पात्र ठरणारा पहिला देश ठरला आहे. दुसऱ्या एका सामन्यात, कॅनडानं घरच्या मैदानावर झालेल्या ब गटातल्या लढतीत कतारवर ६-० असा दणदणीत विजय नोंदवला. ब गटातच, काल रात्री अमेरिकेतील लॉस एंजेलिस स्टेडियमवर झालेल्या सामन्यात स्वित्झर्लंडने बोस्निया-हर्झेगोव्हिनाचा ४-१ असा पराभव केला.

//<><><><><>//